महत्वाचे

# महाराष्ट्र शासन
## उद्योग संचालनालय

New Administrative Building, III[rd] Floor, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Opp. Mantralaya, Mumbai-400032

क्र.उसं./ निप्रशा/ निर्यात पुरस्कार/२०२२ / सि- 12636 दिनांक: 20 DEC 2022

**स्मरणपत्र - २**

प्रति,

१. मा.उद्योग सह संचालक,
विभागिय कार्यालय (सर्व)

२. अधिक्षकीय उद्योग अधिकारी,
उपविभाग कार्यालय, नांदेड

३. जिल्हा उद्योग केंद्र (सर्व)

विषय :- सन २०१८-१९ ते सन २०२१-२२ करीता उत्कृष्ट निर्यात पुरस्कार

संदर्भ :- १. क्र.उसं./ निप्रशा/ निर्यात पुरस्कार/२०२२/सी-९४४२ दि.२९/०७/२०२२
२. EPC's/Industrial Association Letter No. DI/EXP/Awards_2018-20/2022/C-10655 Dt. 20/09/2022 व दि.०२/११/२०२२

महोदय,

महाराष्ट्र शासनाद्वारे उत्कृष्ट नियातदारांना राज्यस्तरीय निर्यात पुरस्कार प्रदान करुन गौरवण्यात येते. कोव्हिड-१९ च्या अंर्तभावामुळे सन २०१८-१९ व २०१९-२० चे पुरस्कार प्रदान करण्यात आले नाही. सन २०१८-१९,२०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या आर्थिक वर्षातील पुरस्कार देण्याचे आयोजन सन २०२२-२३ या वर्षात प्रस्तावित आहे. याकरीता निर्यात घटक, मर्चन्ट निर्यातदार आणि व्यापार निर्यात संस्था यांचेकडून खालील क्षेत्रातील अर्ज मागविण्यात यावे. उदा. इंजिनिअरींग उत्पादने, इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने , मूलभूत रासायनिक उत्पादने, औषधी व सौधंर्य प्रसादन उत्पादने, केमिकल व अलाईड उत्पादने, प्लास्टिक लिनोलियम उत्पादने, लेदर ॲण्ड लेदर उत्पादने, ताज्या भाज्या व फळे, प्रोसेस फूड ॲण्ड ॲग्रो उत्पादने, सागरी उत्पादने, टेक्सआईल, हस्तकला, जेम्स ॲण्ड ज्वेलरी (व्हर्जिन सिल्वर वगळून). उपरोक्त संदर्भानुसार आपणांस दि.२९/०७/२०२२ रोजी कळविण्यात आले होते परंतु अद्यापही कार्यालयास अर्ज प्राप्त झाले नाहीत. सद्यस्थि:तीत District Conclave सप्टेंबर व ऑक्टोंबर २०२२ या महिन्यात प्रत्येक जिल्हयात घेण्यात आला आहे सदर कार्यक्रमामध्ये निर्यातदारांकडून उत्कृष्ट निर्यात पुरस्काराबाबत अर्ज प्राप्त करण्यासाठी कार्यवाही व समन्वय करणेबाबत व प्रत्येक जिल्हयातून किमान दोन अर्ज मुख्यालयास सादर करावेत. अशा सूचना देणेत आल्या होत्या. अद्यापपर्यंत अल्प प्रमाणात अर्ज प्रस्ताव प्राप्त झाल्याने छाननी प्रक्रीया सुरुवात करता आली नाही. याबाबत मा.विकास आयुक्त (उद्योग) यांनी दि.२०.१२.२०२२ रोजी आढावा घेवून सर्व उपरोक्त नमूद ४ वर्षासाठी निर्यात पुरस्कार अर्ज – प्रस्ताव पुढील १५ दिवसात प्राप्त करणेच्या सूचना दिल्या आहेत. सदर पुरस्कारसाठी ३६ वेगवेगळ्या प्रवर्गातून नामांकन प्रस्ताव सादर होणेसाठी परत एकदा तपशिल देणेत येत आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण पुरस्कार |
|---|---|---|
| १ | मोठे उत्पादन घटक | ११ |
| २ | लघु उत्पादन घटक | १४ |
| ३ | मर्चन्ट निर्यातदार | १ |
| ४ | एक्सपोट हाऊस | १ |
| ५ | ट्रेड हाऊस | १ |
| ६ | विभागीय कार्यालयामार्फत पुरस्कारीत लघु उद्योजक घटक | ६ |
| ७ | स्टेट गर्व्हनमेंट कार्पोरेशन | १ |

| | | |
|---|---|---|
| ८ | सेवा निर्यातदार (सर्विस) | १ |
| | एकुण पुरस्कार | ३६ |

पुरस्कारासाठी निकष खालीलप्रमाणे

१. मागील दोन वर्षातील सुक्ष्म, लघु व मध्यम घटकाची निर्यात कमीतकमी २ करोड असावी व इतर उद्योगांकरीता कमीतकमी ५ करोड असावी.(संदर्भ वर्ष २०१८-१९ अथवा २०१९-२० नुसार)

२. घटकाने संबधित विभागाकडे नियमानुसार ममोरण्डम (Registration) भरलेले असावे.

अर्जासोबत सादरकरावयाची कागदपत्रे

- Application Form in prescribed format (enclosed).
- Acknowledgment of filing of Entrepreneur Memorandum / registration details
- The Exports for last two years dully certified by C.A.(वर्ष २०१८-१९ व २०१९-२० च्या संदर्भात)
- R.C.M.C. Registration,
- Export Code No.
- The Exporter, who has applied earlier, should submit the update figures for subsequent year and the application for current year.

यासोबत अर्जाचा नमुना, पुरस्कार निवडीची पध्दत, निर्यात पुरस्कारासंबधी वेगवेगळया प्रवर्ग, निर्यात पुरस्काराबाबत विस्तृत माहिती, किमान पात्रता, अटी, निवड निकष इ. माहिती जोडण्यात येत आहे. सदर अर्जाचा नमुना व लागणारी कागदपत्रे www.maharashtra.gov.in व https://maitri.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी खालीलप्रमाणे संपर्क साधावा.

श्री.डी. एम. पावडे– उद्योग अधिकारी, मो.नं. – 9930746024

सौ.शिला सं.शिंदे (उद्योग निरीक्षक) - मो.नं. § 9833634845

आपणांस विनंती करण्यात येते की, जास्तीत जास्त अर्ज विहित प्रवर्गात पुढील १५ दिवसांत मुख्यालयास सादर करावे.

आपला विश्वासु,

(एस.आर.लोंढे)
उद्योग सह संचालक (निर्यात)
विकास आयुक्त(उद्योग) यांचेकरीता